
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL



Volume - XI, Issue - II
April - June - 2022
MARATHI

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण व अंतर्गत सुरक्षा विषयक धोरण<br>**प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम** | १-५ |
| २ | मोदींचे परराष्ट्र धोरण : सातत्य की स्थित्यंतर?<br>**डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत** | ६-१२ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्रीय धोरणविषयक विचार<br>**प्रा. कांबळे के. जे.** | १३-१६ |
| ४ | पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र धोरणाचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. विकास बी. चांदजकर** | १७-२१ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्रीय धोरण विषयक दृष्टीकोन<br>**डॉ. प्रमोदकुमार केशव नंदेश्वर** | २२-२७ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार<br>**रविकिरण बसंतराव सदानशिव** | २८-३३ |
| ७ | भारतीय परराष्ट्र धोरणावर नवीन आर्थिक धोरणाचा झालेला परिणाम<br>**डॉ. सुरेश बळीराम गजभारे** | ३४-३७ |
| ८ | मोदींचे परराष्ट्र धोरण बद्दल किंवा सातत्य<br>**प्रा. सुरेन्द्र हरिभाऊ किन्हीकर** | ३८-४२ |
| ९ | भारत-चीन संबंध : चीनचे विस्तारवादी धोरण आणि त्याचे भारतावरील परिणाम<br>**प्रा. डॉ. सुधिर नारायणराव देशमुख** | ४३-४४ |
| १० | कोविड १९ नंतरची भारतातील मानसिक आरोग्य आणि औद्योगिक स्थिती<br>**प्रा. डॉ. गणेश वायकोस** | ४५-४९ |
| ११ | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे** | ५०-५५ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरणावरील विचार<br>**डॉ. मुट्ठे पी. आर.**<br>**कदम आर. बी.** | ५६-५९ |

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | वर्तमानकाळात चीनचे विस्तारवादी धोरण आणि भारत<br>**प्रा. धप्पाधुळे रामेश्वर शंकरराव** | ६०-६४ |
| १४ | कौटिल्य नीतीवर आधारित भारताचे परराष्ट्र धोरण<br>**डॉ. तेजस्विनी गणपतराव कुलकर्णी** | ६५-६७ |
| १५ | भूराजनीतीक संकल्पना, मूलभूत तत्वे, आणि जागतिक पर्यावरणजागृती विषयक आढावा<br>**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार** | ६८-७३ |
| १६ | संयुक्त पुरोगामी आघाडी शासन काळातील भारतीय परराष्ट्र धोरणातील भारत-अमेरिका संबधाचा आढावा<br>**डॉ. बाळासाहेब बजरंग सरगर** | ७४-७६ |
| १७ | पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या काळातील परराष्ट्र धोरण भारत व चीन संबंधात सहकार्य आणि आव्हाणे<br>**प्रा. डॉ. टी. एम. पाटील** | ७७-७९ |
| १८ | भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्कालीन भारतीय नेतृत्वाचा प्रभाव<br>**प्रा. निलंगेकर एस. एस.** | ८०-८२ |
| १९ | पंडीत जवाहरलाल नेहरूची विदेशनिती<br>**प्रा. डॉ. एन. आर. कन्हाके** | ८३-८५ |
| २० | मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन: सातत्य किंवा बदल<br>**डॉ. गजानन बनचरे** | ८६-९४ |
| २१ | पंडित नेहरू यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार: एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. शंकर लेखणे** | ९५-९९ |
| २२ | भारताच्या परराष्ट्र धोरण निर्मितीमधील पंडित नेहरू यांचे योगदान<br>**बांगर आकाश शेषराव** | १००-१०४ |
| २३ | २०१४ ते २०१९ या काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप<br>**प्रा. डॉ. विनोद राठोड** | १०५-१०८ |
| २४ | भारताचे परराष्ट्रीय धोरण: आवलोकन<br>**डॉ. दयाराम द. मस्के** | १०९-११७ |

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-16

# २४. भारताचे परराष्ट्रीय धोरणः आवलोकन

**डॉ. दयाराम द. मस्के**
लोकप्रशासन विभागप्रमुख, आदर्श महाविद्यालय, हिंगोली.

प्रत्येक राज्य आपणांस इष्ट असलेले वर्तन इतर राज्यांनी करावे, यासाठी आपल्या मर्यादित प्रभावाचा विविध स्वरूपांत वापर करून त्या - त्या राज्यातील राज्यकर्त्यांचे मनवळवितेयालाच स्थूलमानाने परराष्ट्रीय धोरण म्हणता येईल. एकोणिसाव्या शतकात राष्ट्रवादाच्या उदयानंतर प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र असावे, हे तत्व सर्वमान्य झाले. जगातील अशा स्वतंत्र राष्ट्रांच्या परस्परसंबंधासबळलाभून त्यातून एका आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे रूप निर्माण झाले. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय समुदायाचा एक भाग असल्यामुळे इतर राज्यांशी आपले संबंध निश्चित करण्याच्या गरजेतून त्यास आपले परराष्ट्रीय धोरण ठरवावे लागते. 'धोरण' या शब्दातून पूर्व-नियोजनाचा अर्थ ध्वनित होतो; परंतु अंतर्गत क्षेत्रातील आर्थिक किंवा सामाजिक धोरणापेक्षा परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप वेगळे असते.

राज्यांतर्गत घटकांवर ज्या प्रमाणात राज्यकर्त्यांचे नियंत्रण असू शकते, त्यामानाने आंतरराष्ट्रीय समुदायाच्या घटकावंरम्हणजे इतर राज्यांवरत्याचे नियंत्रण अत्यल्प असते. त्यामुळे परराष्ट्रीय धोरण हे अनेक अनियंत्रित घटकांवर अवलंबून असते आणि म्हणून आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणत्याही राज्यास कालबद्ध तसेच योजनाबद्ध असे आखीव धोरण ठरविणे शक्य नसते. या दृष्टीतून परराष्ट्रीय धोरणाची तुलना स्वयंचलित जहाजापेक्षा नौकानयनाशी करता येण्यासारखी आहे. ज्याप्रमाणे प्रवाह, वारा, भरती व ओहोटी इ. घटक लक्षात घेऊन इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी नाविक हा बाह्य परिस्थितीशी स्वतःस जुळवून घेतोत्याप्रमाणे राज्यकर्त्यासही आपले ध्येय साध्य करण्यासाठीस्वतःच्या नियंत्रणाबाहेर असलेले अनेक घटक व वरचेवर घडणाऱ्या अकल्पित घटना लक्षात घेऊन आपल्या धोरणाची दिशा व डावपेच ठरवावे लागतात. अर्थात परराष्ट्रीय धोरण परिणामकारक होण्यासाठी त्यात एकसूत्रता आणि लवचिकपणा हे दोन्ही गुण आवश्यक असतात.

इ.स.पू. चौथ्या शतकात कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात राजाने अंगीकारावयाच्या परराष्ट्रीय धोरणाबावत चिकित्सा केली आहे. कौटिल्याच्या कल्पनेप्रमाणे राजाचे ध्येय आपल्या राज्याची वृद्धी करून साम्राज्य स्थापन करणे, स्वतः चक्रवर्ती होणे हे असावयास हवे. यासाठी अंगीकारावयाच्या धोरणाचे स्वरूप अर्थातच आधुनिक काळातील स्वतंत्र राष्ट्राशी संबंधित असणाऱ्या परराष्ट्रीय धोरणापेक्षा वेगळे आहे. कौटिल्याच्या धोरणास फार तर विस्ताराचे राजकारण म्हणता येईल. कौटिल्यप्रणीत धोरणाची उद्दिष्टे आधुनिक परराष्ट्रीय धोरणाच्या उद्दिष्टांपेक्षा काहीशी वेगळी असली, तरीही त्या धोरणाची रूपे, त्यासाठी लागणारी क्षमता आणि त्याची साधने यांची कौटिल्याने केलेली चर्चा विचारार्ह ठरते.

राज्यविस्तारासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या पुढील सहा धोरणांची चर्चा कौटिल्य करतो :

(१) संधी (स्नेहसंबंध),

(२) विग्रह (संघर्ष),

(३) आसन (तटस्थता),

(४) यान (आक्रमण),

(५) संश्रय (पराश्रय),

(६) द्वैधिभाव (काही राज्यांशी युद्ध, तर काहींशी तह).

या धोरणांचा वापर स्थल, काल, परिस्थितीनुरूपकरावयाचा आहे. कौटिल्याने तीन प्रकारच्या शक्ती कल्पिल्या आहेत :

१. मंत्रशक्ती (ज्ञान व धोरण यांवरआधारलेली),

२. प्रभुशक्ती (आर्थिक व सैनिकी बळावर आधारलेली),

३. उत्साहशक्ती (साहस व मनोधैर्ययावंरआधारलेली).

यांचा उपयोग धोरण अंमलात आणण्यासाठी करावयाचा असे. कौटिल्याच्या मतानुसार धोरणाचे यशापयश या विविध शक्तींवरअवलंबून असते. त्याशिवाय धोरण राबविण्यासाठी चार पर्यायी उपायांची चर्चाही कौटिल्याने केली आहे. ते चार उपाय म्हणजे

१. साम

२. दाम

३. दंड

४. भेद

असे आहेत. राजनय, अर्थसाह्य, बल व प्रचार ही त्यांची आधुनिक रूपे म्हणता येतील आणि परराष्ट्रीय धोरणाची साधने म्हणून त्यांचा वापर होत असल्याचेही दिसून येते.

एखाद्या देशाच्या परराष्ट्रीय धोरणाकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोणानुसार तेथील प्रस्थापित राज्यकर्त्यावर्गाची विचारसरणी, त्यांची मूल्ये यांचा अभ्यास केला जात असे. प्रत्येक देशाचे परराष्ट्रीय धोरण हे तेथील राज्यकर्त्या वर्गाच्या मूल्यांचे आणि विचारप्रणालीचे प्रक्षेपण असते, अशी समजूत त्याच्या मुळाशी आहे. या अर्थाने परराष्ट्रीय धोरणाचे वर्गीकरण लोकशाहीवादी, सर्वंकषसत्तावादी, उदारमदवादी, साम्यवादी, आक्रमणवादी असे करण्यात येते. या अर्थानेच इंग्लंडचे धोरण उदारमतवादी, तर दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानचे आणि सध्या चीनचे व रशियाचे धोरण आक्रमणवादी आहे, असे सांगितले जाते. सर्वसाधारण जनतेची परराष्ट्रीय धोरणाकडे बघण्याची हीच दृष्टी असते. त्यामुळे एखाद्या अमेरिकेसारख्या लोकशाहीवादी देशाने पाकिस्तानसारख्या हुकूमशाही राष्ट्राशी सख्य करणे, रशियासासारख्या एखाद्या साम्यवादी राष्ट्राने चीनसारख्या दुसऱ्यासाम्यवादी राष्ट्राच्या विरोधात उभे राहणे, हे त्यांना विसंगत वाटते.

परराष्ट्रीय धोरणाकडे बघण्याचा हा धोपटमार्ग अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवतो. उदा., इंग्लंडमध्ये युद्धोत्तर काळात सत्ताधारी पक्ष अनेकदा बदलूनही परराष्ट्र-धोरण बदलले नाही. १९१७ मध्ये रशियात क्रांती होऊनही रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाचे लक्ष्य फारसे बदलले, असे म्हणता येणार नाही परंतु २०२२ मध्ये युक्रेणवरील आक्रमण ताठर भुमिकेचे निदर्शक आहे.

देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे महत्त्वाचे आहे, असे संबंध विशिष्ट तत्त्वे आणि धोरणांवर आधारित असतात. या तत्त्वे आणि धोरणांना परराष्ट्र धोरण म्हणता येईल. परराष्ट्र धोरणाची तत्त्वप्रणाली साधी आणि संक्षिप्त असू शकते किंवा गुंतागुंतीची आणि संदिग्धपण असू शकते. परराष्ट्र धोरणात निश्चितपणे राष्ट्र- राज्याची राजकीय उद्दिष्टे, नैतिक तत्त्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. परराष्ट्र धोरण अंतर्गत पोकळीत अस्तित्वात येऊ शकत नाही. राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भामध्ये परराष्ट्र धोरण तयार होत असते. राष्ट्र-राज्याच्या निर्मितीशी संबंधित ऐतिहासिक घडामोडी, राष्ट्र निर्मितीची वैचारिक तत्वे, चौकट आणि राष्ट्र-राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान यांच्या संगमातून राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा उगम होतो. राष्ट्राच्या राज्यसंस्थेचा प्रकार,अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडणघडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार प्राप्त होतो. आधुनिक काळात राष्ट्र - राज्यांना आपापल्या राष्ट्र हितांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी परराष्ट्र धोरणाची आवश्यकता निर्माण झाली.

**गृहीतके Hypothesis**

१. इंडो-पॅसिफिक आणि 'क्वाड'मुळे भारत अलिप्तवादी तत्वांपासून काहीसा दूर जात चालला आहे
२. जागतिक महासत्तांच्या राजकारणात बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याताना राष्ट्रावादाला अनन्यसाधारण महत्व आहे.
३. अमेरिकेसोबत संबंध सुधारण्यावर भर देणे गरजेचे आहे
४. शीत युद्ध ही संकल्पना आता सर्वज्ञात आहे
५. भारताने २०२० मध्ये भारतीय राष्ट्रावादाचे दर्शन जगाला घडवले आहे आणि त्यामुळे चीन राष्ट्रावादाला एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**उद्दिष्टे Objectives**

१. देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करणे.
२. देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी बाह्य शक्तींना आवश्यक त्या प्रमाणे प्रभावित करणे.
३. इतर देशांमध्ये वास्तव्यांस असणाऱ्या देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याणाबाबत योग्य ती पावले उचलणे.
४. इतर देशांशी सांस्कृतिक संबंध बळकट करणे.

५. इतर देशांशी व्यापार वाणिज्य तंत्रज्ञान शिक्षण पर्यावरण क्रीडा इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये संपर्क वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेस त्याचा लाभ पोहोचवणे.

**परराष्ट्रीय धोरणाचे निर्धारक घटक**

पारंपरिक दृष्टिकोणापेक्षा विश्लेषणात्मक दृष्टिकोण अधिक महत्त्वाचा आहे. या दृष्टिकोणानुसार परराष्ट्रीय धोरणास कारणीभूत होणारे घटक अनेक असल्याचे मानले जाते. प्रत्येक देशाची भौगोलिक स्थिती, त्याची अर्थव्यवस्था, राजकीय व ऐतिहासिक परंपरा, सांस्कृतिक वातावरण या सर्वांच्या प्रभावातून देशाच्या परराष्ट्रीय धोरणाचे लक्ष्य ठरते, तात्कालिक शासन, फार तर, हे लक्ष्य गाठण्याच्या विविध मार्गातून एखाद्याची निवड करू शकेल एवढेच. हे लक्ष्य वस्तुनिष्ठ परिस्थितीतून ठरले असल्यामुळे ते कायम असते व याचाच निर्देश 'राष्ट्राहित' या संज्ञेने केला जातो. परराष्ट्रीय धोरणाने राष्ट्रहिताचे संवर्धन केले पाहिजे, असे हेन्रीमॉर्गेनटाउसारखेराज्यशास्त्रज्ञ सांगतात. तथापि एखाद्या देशाचे सर्व प्रकारचे हित परस्परपूरक, सुसंगत, सारखेच महत्त्वाचे असेल असे नाही. उदा., आपल्या राजकीय स्वातंत्र्याचे, प्रादेशिक अखंडत्वाचे रक्षण करणे हे अत्यंत जिव्हाळ्याचे, तर व्यापारवृद्धी हे त्या मानाने कमी महत्त्वाचे हित मानता येईल.

शेजारच्या राज्यातील घटना या दूरच्या राष्ट्रांतील घटनांपेक्षा जास्त गंभीर स्वरूपाच्या वाटणे स्वाभाविक असते. त्यांच्या महत्त्वानुसार राष्ट्रीय हितांची रचना एखाद्या उतरंडीसारखी असते. ही रचना चिरंतन तशीच राहील, असेही नव्हे, आजूबाजूच्या राष्ट्रांत व जगात इतरत्र होणाऱ्या तंत्रज्ञान, विज्ञाने, सैनिकीव्यवस्थायांतीलबदलांनुसारत्यांतही बदल होणे स्वाभाविक आहे. राष्ट्रहित या संकल्पनेच्या अनेक बाजू अस्पष्ट असतात. उदा., राष्ट्रहित म्हणजे राष्ट्रातील नेमक्या कोणत्या समूहांचे हित? त्यांचे हित कोणी व कसे ठरवावयाचे? साकल्याने राष्ट्राचे हित ठरविण्यासाठी या हितांची बेरीज कशी करणार? कोणंते हित किती महत्त्वाचे व हे ठरवावयाचे निकष कोणते? गतेतिहासाकडे वळून पाहताना त्या काळातील धोरण राष्ट्रहितास पोषक होते की नाही, हे कदाचित ठरविता येईल; परंतु वर्तमान काळात राज्यकर्त्या वर्गास ज्या गोष्टी राष्ट्रहिताच्या वाटतात, ते राष्ट्रहित असे समीकरण बनले आहे. राष्ट्रहिताची व्याख्या अशी आत्मनिष्ठ झाल्यामुळे आपल्या धोरणाचे समर्थन करण्यासाठी प्रचाराचे एक साधन, असे त्याचे स्वरूप झाले आहे

राष्ट्रहिताची संकल्पना विश्लेषणाच्या दृष्टीतून अशी निसरडी असली, तरीही तिचा आंतरराष्ट्रीय राजकारणात वराच वापर केला जातो. त्यासाठी काही लेखक 'हित', 'लक्ष्य' व 'उद्दिष्ट' यांत भेद करतात. हित हे स्थूल स्वरूपातधोरणामागील हेतू दर्शविते, तर कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात आपणास इष्ट अशी परिस्थिती निर्माण करणे यातून परराष्ट्रीय धोरणाचे लक्ष्य ठरते. युद्धोत्तर काळात रशियाच्या साम्यवादी विस्तारास अटकाव करणे हे अमेरिकिचे, तर आशियातून अमेरिकन प्रभावाचे उच्चाटन करणे हे चीनचे लक्ष्य होते.

देशाच्या अंतर्गत व बाह्य परिस्थितीवर अवलंबूनराहील. त्यासाठी वापरण्याची साधने ही उद्दिष्टांस अनुरूप असावी लागतील. ती एकंदर देशाच्या क्षमतेबाहेर नाहीत, हेही पाहावे लागेल. देशाची भौगोलिक रचना, लोकसंख्या, निसर्गसंपती, औद्योगिक विकास, राजकीय नेतृत्व, ऐतिहासिक परंपरा, विचारप्रणाली, राजकीय व्यवस्था, लष्करी सामर्थ्य हे सर्व देशांतर्गत घटक लक्षात घ्यावे लागतील. यांवरोबरच आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील घटक : आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांसारख्या संघटना, आपले शत्रू-मित्र आणि त्यांचे बलाबल या सर्व घटकांचे मूल्यमापन करून मगच परराष्ट्रीय धोरण ठरते.

या वस्तुस्थिती निदर्शक घटकांप्रमाणेच प्रत्यक्षात परराष्ट्रीय धोरणासंबंधी निर्णय घेताना या घटकांचे मूल्यमापन कसे केले जाते, उद्दिष्टांचे अग्रक्रम कसे ठरविले जातात, घटनांचे कार्यकारणसंबंध कसे तपासून पाहिले जातात, हेसुद्धा परराष्ट्रीय धोरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. कोणत्याही देशात यासंबंधीचे निर्णय एकच व्यक्ती घेत नाही. देशाच्या संविधानात निर्णय घेण्यासाठी यंत्रणा ठरविलेली असते. प्रत्यक्षात देशांतर्गत विविध गटांच्या (लष्कर, नोकरवर्ग, औद्योगिक संघटना, मजूर संघटना इ.) ओढाताणीतून निर्णय ठरतात. या गटांचे हेतू, त्यांचे महत्त्व, त्यांची कार्यपद्धती या सर्वांचा धोरणावर परिणाम होतो. निर्णय घेणारे गट आंतरराष्ट्रीय घटना आणि त्यांमागीलकारणमीमांसा समजण्यासाठी विचारप्रणालीचा उपयोग करतात व धोरण ठरवितात. या संदर्भात विचार प्रणालीचा परराष्ट्रीय धोरणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. दोन किंवा अधिक देशांच्या निर्णयकर्त्यांना जेव्हा आपले हित समान वा परस्परपूरक आहे असे वाटते, तेव्हा त्या देशांत परस्पर सहकार्याची सुरुवात होते. करार (उदा., भारत-रशिया करार १९७१), राष्ट्रांची युती (उदा., नाटो किंवा वॉर्सा करार), देशी व्यापार ही त्याची रूपे होत. याउलट आपले हित परस्परविरोधी आहे, असे वाटल्यास त्याची परिणती स्पर्धेत होते. परदेशी व्यापारावरील निर्बंध, तंटे किंवा युद्ध अशा रूपात ही स्पर्धा चालते.

**परराष्ट्रीय धोरणांची साधने**

परराष्ट्रीय धोरणाची उद्दिष्टे ठरविल्यानंतर ती साध्य करण्यासाठी जे मार्ग अनुसरले जातात, त्यांचे प्रामुख्याने पाच प्रकार पाडता येतील; त्यांतीलराजनय हा पुरातन काळापासून वापरलेला मार्ग आहे. पूर्वी आणि आजही विविध प्रकारच्या राजदूतांकरवी बोलणी वा वाटाघाटी केल्या जातात. प्राचीन भारतातील साहित्यातही (उदा., कौटिल्याच्या अर्थशास्त्रात) त्यांचे उल्लेख आहेत. या वाटाघाटी बहुधा गुप्त असतात. आधुनिक काळात यांच्या जोडीला राज्यकर्त्यांच्या शिखर परिषदांतून, संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थातून अथवा खास भरविलेल्या संमेलनांतूनही अशा वाटाघाटी चालतात. यांतील चर्चा ही कित्येकदा उघडपणे चालते. याला संसदीय राजनय अशी संज्ञा आहे.

परराष्ट्रीय धोरणाचे सत्तासमतोल हे सुद्ध पारंपरिक साधन मानले जाते. त्याचे अनेक अर्थ असले, तरी साधारणपणे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कोणताही एक देश अतिबलशाली (सुपर पॉवर) होऊ नये, यासाठी केलेली राष्ट्रांची युती अथवा केलेले करार, असा याचा अर्थरूढ आहे. सतराव्या शतकापासून ते विसाव्या

शतकापर्यंत इंग्लंडने यूरोपातील राष्ट्रांमध्ये समतोल राखण्याची भूमिका बजाविली होती. एकोणिसाव्या शतकातील फ्रान्स व जर्मनी यांच्या स्पर्धेत सुरुवातीस फ्रान्सच्या वाढत्या सामर्थ्यास रोखण्यासाठी त्याविरुद्ध फळी उभारली, तर नंतर ऑस्ट्रिया-जर्मनी युती प्रभावशाली होऊ नये म्हणून फ्रान्सशी जवळीक केली. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात रशिया व अमेरिका यांच्यात राजनैतिक सत्तासमतोलराखण्याचे काम अलिप्त राष्ट्रांनी केले आहे, असे दिसते.आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक राष्ट्रे दुसऱ्या राष्ट्रांवर आर्थिक दडपण आणतात किंवा त्यांना आर्थिक प्रलोभने दाखवितात. अमेरिकेने रशियाशी व्यापार करण्यावर घातलेले निर्बंध, खनिज तेला सारख्या महत्त्वाच्या पदार्थांसंबंधी १९७३ मध्ये अरब देशांनी केलेली पाश्चात्य देशांची नाकेबंदी, तांत्रिक सहकार्य किंवा आर्थिक साह्य (उदा., मार्शल योजना) ही त्याची उदाहरणे होत.

अलीकडच्या काळात इतर राष्ट्रांना स्वतःस अनुकूल करून घेण्यासाठी प्रचारयंत्रणेचा सर्रास वापर केला जातो. प्रतिस्पर्धी राष्ट्रांतील लोकांचे मनोधैर्यखच्ची करणे, त्यांच्या मनात संभ्रम निर्माण करणे, त्यांच्यात कलागत लावून देणे, स्वतःच्याविचारप्रणालीचा प्रसार करणे, यांसारख्या अनेक मार्गाचा अवलंब केला जातो. विसाव्या शतकात परराष्ट्रीय धोरणाच्या यशस्वीतेसाठी जनतेचा पाठिंबा आवश्यक होऊ लागल्यापासून प्रचारयंत्रणेचे महतवआणखीनच वाढले आहे.सैन्यबळाचा प्रत्यक्ष उपयोग किंवा उपयोग करण्याची धमकी यांचा वापर परराष्ट्रीय धोरणासाठी प्राचीन काळापासून करण्यात आला आहे. क्लाउझेव्हिट्सच्या म्हणण्याप्रमाणे युद्ध हे राजनयाचेच एक वेगळे रूप आहे. सैनिकी हस्तक्षेप करून शस्त्रास्त्रांचा पुरवठा किंवा बंदी करून, आण्विक शक्तीचा वचक बसवून इतर राष्ट्रांस आपणास इष्ट ती भूमिका घेणे भाग पाडण्याचे प्रयत्न केले जातात.

परराष्ट्रीय धोरण आणि देशांतर्गत राजकारण यांचाही जवळचा संबंध असतो. युद्धाच्या प्रसंगी कधी लोकांत एक्यभावाना निर्माण होते, तर कधी त्यामुळे राजकीय वादळ सुरू होते. १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाक युद्धांमुळे लोकांची एकात्मता दिसून आली व आत्मविश्वास वाढीस लागला. याउलट अमेरिकेत व्हिएटनामच्या युद्धामुळे मतभेद निर्माण झाले. परराष्ट्रीय धोरणातील अपयशामुळे देशात सत्तापालट झाल्याचीही उदाहरणे आहेत. दुसऱ्या महायुद्धापूर्वी परराष्ट्रीय धोरण फसल्यामुळे इंग्लंडचे पंतप्रधान नेव्हिलचेंबरलिन यांना पदत्याग करावा लागला होता. अंतर्गत राजकारणाचेही परराष्ट्र धोरणावर परिणाम होतात. निर्णय घेण्याची यंत्रणा एकसंध नसली, तर धोरण आखण्यात अडथळे निर्माण होतात. उदा., अमेरिकेत अध्यक्ष आणि सिनेट या दोघांत अनेकदा एकवाक्यता असत नाही. त्यामुळे धोरण निश्चित करणे कठीण होते. परराष्ट्रीय धोरणाचा परिणाम देशातील अनेक हितसंबंधावर होतात. हे गट आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी निर्णयकर्त्यांवर दडपण आणतात. या सर्व देशांतर्गत घटकांच्या आंतर-क्रियेतून परराष्ट्रीय धोरण घडत जाते.

इंडो-पॅसिफिक आणि 'क्वाड'मुळे भारत अलिसवादी तत्वांपासून काहीसा दूर जात चालला आहेइंडो-पॅसिफिक सागरी क्षेत्र आणि नव्याने उदयास येत असलेली ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका यांची चतुर्भुज युती म्हणजेच क्वाड ही भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील मोठी विसंगती असल्याचे मानले जात आहे. इंडो पॅसिफिक प्रदेश आणि क्वाड यांचे विरोधक आणि समर्थक या दोघांचेही याबाबतीत एकमत झाले आहे. अलिसतावादी धोरण आणि लष्करी स्वायत्तता ही दोन तत्वे प्रदीर्घ काळ भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अविभाज्य भाग होती. आता इंडो-पॅसिफिक आणि क्वाडच्या निमित्ताने भारत या तत्वांपासून काहीसा दूर जात चालला आहे. यावर काही प्रमाणात टीका होत असली तरी याचे स्वागतही केले जात आहे.

भारत आपल्या पारंपरिक अलिसतवादी धोरणापासून दूर जात एका वेगळ्या प्रकारे परराष्ट्र धोरणाची आखणी करत आहे. असे असले तरीही आजूबाजूच्या आशियाई देशांना क्वाडचे महत्व पटवून देणे हे आव्हानात्मक असणार आहे. क्वाड आणि चीन यांच्यातील संघर्षाबाबत आशियात मोठ्या प्रमाणावर चिंतेचे वातावरण आहे. आशियातील ही नवी दरी समजून घेत अनेक देशांनी अलिसतवादी धोरणाचा अवलंब केला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर भारताला जी चिंता वाटत होती त्याप्रकारची चिंता आता या देशांनाही वाटते आहे.आशियाई राष्ट्रवादाचा योग्य रीतीने वापर करून या देशांना आपल्या बाजूला वळवून घेणे, हे भारताच्या दृष्टीने हिताचे असणार आहे. भारताच्या अलिप्तवादी धोरणाचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे दिसून येते की जागतिक महासत्तांच्या राजकारणात बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यातानाराष्ट्रवादाला अनन्यसाधारण महत्व आहे.**स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब केला. ज्यावेळेस संपूर्ण जग दोन बाजूंमध्ये विभागले जात होते त्यावेळेस कोणतीही बाजू न निवडण्याचे भारताने ठरवले. दोन शतके भारत परकीय सत्तेच्या अधिपत्याखाली होता. परिणामी जागतिक स्तरावर महासत्तांच्या संघर्षात आपले स्वातंत्र्य कोणाच्यातरी अधीन राहून गमावणे भारतीय नेत्यांना पटणारे नव्हते.**

भारताने ज्याप्रकारे राष्ट्रीय हितासाठी शीतयुद्धातील दोन्ही बाजूंशी जुळवून घेण्याची भूमिका घेतली, त्याचप्रमाणे वेळ आल्यावर कोणत्याही एका बाजूला समर्थन देण्यापासून भारत मागे राहिला नाही. अमेरिका आणि चीन यांच्या युतीने बिघडलेला प्रादेशिक सुरक्षा समतोल राखण्यासाठी १९७० मध्ये भारताने रशियाची मदत घेतली. या प्रयत्नात भारत सोविएत रशियाच्या अधिक जवळ गेला होता. परिणामी आता अमेरिकेसोबत संबंध सुधारण्यावर भर देणे गरजेचे आहे, असे मत १९८० च्या दशकात पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी मांडले होते.सोविएत रशियाच्या पतनानंतर, भारताने लष्करी सहकार्यासाठी अमेरिकेसोबत संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले. युनिपोलर किंवा एकध्रुवीय जगातील अमेरिकेच्या कृतींबाबत भारताला साशंकता होती. म्हणूनच रशियाच्या पुढाकाराने निर्माण

झालेल्या स्ट्रेटेजिक त्रिकोणामध्ये भारताने चीनसह सहभाग घेतला. अर्थात पुढे यात ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका जोडले गेल्याने ब्रिक्सचा उदय झाला.

२००० मध्ये चीनच्या वाढत्या हालचाली आणि भारताच्या भूमी आणि सागरी सीमांवरील कारवाया लक्षात घेता संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याच्या मुद्द्यांवर भारताने अमेरिकेची मदत घेतली. अमेरिकेपासून लष्करी स्वायतत्ता मिळवण्यासाठी भारताचा रशिया आणि चीनकडे अधिक कल होता. पण चीनच्या वाढत्या प्रभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती सुधारण्यासाठी भारत-अमेरिका यांच्यातील संबंध सुधारत गेले.

भारताच्या परराष्ट्र संबंधांमध्ये अलिप्ततावाद आणि लष्करी स्वायतत्ता यांना अनुसरून नेहमीच निर्णय घेतले गेले नाहीत, तर त्या त्या वेळी उद्भवलेल्या परिस्थितीचे गांभीर्य समजून घेत भारताने पावले उचलली आहेत. परंतु भारतातील शिक्षण आणि राजकीय क्षेत्रातील तज्ञांकडून नेहमीच भारत अलिप्ततावादी धोरण अनुसरणारा देश आहे असे चित्र निर्माण केले गेले आहे.भारतासंबंधीचे हे चित्र उर्वरित आशियाच्या बाबतही दिसून आले आहे. आशियातील काही देशांनी अमेरिकेशी हातमिळवणी केली आहे. पण हा अपवाद वगळता इतर सर्व देशांनी स्वतंत्र राहण्याचे आणि स्वातंत्र्य टिकवून ठेवण्याचे धोरण अनुसरले आहे. चीनने परिस्थितीनुसार बाजू निवडण्याचे धोरण अनुसरले. आधी सोविएत रशिया आणि मग अमेरिका यांच्याशी जोडून घेण्याचा चीनने निर्णय घेतला. काही देशांनी अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब केला. परंतु त्या देशांसाठी अलिप्ततावाद आणि इतर देशांना पाठिंबा यांच्यातील रेषा पुसट होती.

१९५० मध्ये अमेरिकेसोबतअँटी- कम्यूनिस्ट युतीने जोडल्या गेलेल्या पाकिस्तानने भारताला शह देताना चीनसोबत जाण्यात फारसा वेळ दवडला नाही. फिलिपाईन्स आणि थायलंड हे देश आधी अमेरिकेचे मित्रराष्ट्र म्हणून ओळखले जायचे परंतु आता त्यांनी चीनसोबत संबंध जोडलेले आहेत. सुरक्षा संवंधात अमेरिकेवर अवलंबून असलेल्या दक्षिण कोरियाने आता वॉशिंग्टन आणि बीजिंग यांच्यासोबतच्या संवंधात समतोल साधलेला आहे. पाश्चिमात्य देशांशी संबंध असलेल्या अनेक आशियाई राष्ट्रांनी नव्या शीतयुद्धात चीन किंवा क्वाडची बाजू घेण्यास नकार दिला आहे .यामुळे आशियाई देशांतील परस्पर संवंधांचे दर्शन घडते आहे. शीत युद्ध ही संकल्पना आता सर्वज्ञात आहे. परंतु अमेरिका आणि सोविएत रशिया यांच्यातील संघर्ष हा अमेरिका आणि चीन यांच्यातील संघर्षापेक्षा वेगळा आहेत. याचे पहिले कारण म्हणजे अमेरिका आणि सोविएत रशिया यांच्यातील संघर्ष आशियाच्या भूमीवर झाला नाही. पण अमेरिका आणि चीन यांचा संघर्ष थेट संघर्ष आशियाची भूमी आणि सागरी सीमांमध्ये होतो आहे. सध्याची आशियाची स्थिती तत्कालीन मध्य युरोपाप्रमाणे आहे.

रशिया हा देश युरोपच्या पूर्व भागात स्थित आहेत. ह्याविपरीत चीन हा देश आशियाच्या मध्यभागी स्थित आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे युरोप हा रशियाच्या अर्थव्यवस्थेशी जोडलेला नव्हता.

पण चीन हा आशियाच्या अर्थव्यवस्थेचे एक अविभाज्य भाग आहे. वॉशिंग्टन आणि बीजिंग यांच्यातील संघर्षाला अमेरिका आणि चीनच्या परस्पर आर्थिक अवलंबित्वाची किनार आहे.**आशियातील प्रत्येक देश चीनच्या सीमेशी जोडला गेलेला आहे. तसेच अमेरिकेची आशियाप्रती असलेली बांधिलकी याबाबत आशियातसाशंकतेचे वातावरण आहे. तसेच चीनने ऑस्ट्रेलियाला केलेली सक्ती पाहता उघडपणे कोणताही आशियाई देश चीनच्या विरुद्ध उभा राहण्यास तयार होणार नाही. त्यामुळे प्रत्येक देश अलिप्ततावाद आणि तटस्थतेची भाषा बोलत आहे.**पण आशियाई राष्ट्रवादाने चीनची विस्तारवादी वृत्ती मान्य केली आहे हे समजणे चुकीचे ठरेल. परंतु आर्थिक स्वावलंबित्व, राजकीय भूगोल, बीजिंगचा वाढता प्रभाव लक्षात घेता कोणत्याही राष्ट्राला त्याच्यावर असेलला चीनचा प्रभाव कमी करणे शक्य होणार नाही.

भारताने २०२० मध्ये भारतीय राष्ट्रावादाचे दर्शन जगाला घडवले आहे आणि त्यामुळे चीन राष्ट्रवादाला एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे. चीनच्या सीमेवर घटनांना वेग येत असला तरीही आशियाई राष्ट्रवाद हा बळकट आहे. अमेरिकेतील काही लोकांच्या मते 'राष्ट्रवाद' हा एकप्रकारे शाप आहे. पण आशियातील लढाईत राष्ट्रवाद हे एक प्रभावी शस्त्र ठरणार आहे. क्वाडचे यश दोन महत्वाच्या गोष्टींवर अवलंबून आहे. एक म्हणजे चीनवरील वाढत्या आर्थिक अवलंबित्वाला पर्याय निर्माण करणे आणि दुसरे म्हणजे चीनकडून राजकीय आणि सुरक्षा समर्थन मिळणाऱ्या आशियाई देशांसाठी राजकीय आणि आर्थिक सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणे.